नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - ४ थे<br>Year - 4rd | अंक - १३१<br>Issue - 131 | वार - मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०२६<br>Blow- Tuesday Date 6 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# राज्यात १६ ऑक्टोबरपासून पाणीकपात

## संभाव्य दुष्काळसदृश्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाचे महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायतींना आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अलनिनोच्या प्रभावाम ुळे राज्यात यंदा पर्जन्यमानात म ोठी घट झाली असून राज्यातील जलसाठा मर्यादित आहे. या संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचे पाण्याचे धरणनिहाय व वापरनिहाय अत्यंत सूक्ष्म नियोजन केले आहे. राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून १६ ऑक्टोबर २०२६ पासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १०% पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

सन २०१६ च्या खरीप हंगाम ातील 'ट्रिगर-१' लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. पुढील वर्षापर्यंत अलनिनोचा प्रभाव राहण्याची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने सर्व संबंधित यंत्रणांना पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करण्याचे आणि कठोर उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट आदेश दिल्याचे महाजन यांनी सांगितले.

जलसंपदा मंत्री गिरीश महाजनांचे महत्त्वाचे निर्णय व निर्देश :

### नागरिकांना जलसंपदा मंत्री आवाहन

**दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंपदा विभाग, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग पूर्ण समन्वयाने काम करत आहेत. पालकमंत्री आणि कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाण्याचा नियमित आढावा घेतला जाईल. आगामी वर्षातील पाण्याचे संकट टाळण्यासाठी नागरिकांनी आणि सर्व यंत्रणांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.**

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य व १०% आपत्कालीन बफर साठाः- धरणे व जलाशयांमधील पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य दिले जाईल. बाष्पीभवन, गाळ व अनधिकृत उपसा विचारात घेऊन ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी आरक्षित ठेवले जाईल. याशिवाय, भविष्यातील अनिश्चितता लक्षात घेऊन प्रत्येक धरणात १०% अतिरिक्त आपत्कालीन बफर साठा राखीव ठेवला जाईल. अत्यंत गरज भासल्यास तांत्रिक तपासणी करून मृतसाठ्यातील पाण्याचाही वापर केला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांना





सूचना व सांडपाण्याचा पुनर्वापर :- सर्व महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायतीनी १६ ऑक्टोबरपासून १०% पाणीकपात लागू करावी. पाणीगळती रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चाल-वून प्रक्रिया केलेले पाणीच बागा, बांधकाम व धुलाईसाठी वापरावे.

शेती व सिंचनाचे नियोजनः

पिण्याचे पाणी, जनावरे आणि चाऱ्याची गरज भागल्यानंतरच उर्वरित पाण्याचे सिंचनासाठी वाटप होईल. प्रथम रब्बी हंगामातील भुसार व चारा पिकांना, त्यानंतर इतर रब्बी पिकांना आणि पाणो शिल्लक राहिल्यासच बारम ाही पिकांना मंजुरी दिली जाईल. पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर भर दिला जाईल.

उद्योगांसाठी ३०% पाणी पुनर्वापर बंधनकारक

औद्योगिक क्षेत्रातील वापरासाठी किमान ३०% पाण्याचा पुनर्वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

अनधिकृत पाणी उपशावर होणार कडक कारवाई

धरणे, नद्या व कालव्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा तात्काळ रोखण्यासाठी महसूल, पो-लीस व जलसंपदा विभागाची संयुक्त पथके गस्त घालतील. दोषर्षीवर कारवाई करून बेकायदेशीर पंप व साहित्य जप्त केले जाईल.

# दुष्काळी कामांसाठी आमदार निधीतून करणार मदत, टंचाई निवारणासाठी सरकारचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर टंचाईग्रस्त भागांमध्ये तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी आमदार स्थानिक विकास निधीतून २५ लाख रुपयांपर्यंतचा निधी खर्च करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी नियोजन विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.



राज्यातील २६५ तालुक्यांम ध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण तसेच ना-गरी भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईसह अन्य समस्यांवर स्थानिक पा-तळीवर तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी आमदार निधीतून ही कामे हाती घेण्याची मुभा देण्यात आली आहे. २५ लाख रुपयांच्या कमाल मर्यादेत कामे मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

या निधीतून टंचाईग्रस्त भागांत तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना सुरू करणे, नवीन नळ जोडण्या देणे, जुन्या पाणीपुरवठा योजना आणि पाईपलाइनची विशेष दुरुस्ती करणे, पाणीपुरवठा विहिरी खोल करणे व त्यातील गाळ काढणे, तसेच नवीन विंधन विहिरी आणि साध्या विहिरी बांधणे शक्य होणार आहे. पाणीसाठ्यासाठी प्लास्टिकच्या टाक्या बसविणे आणि नदीपात्रात बुडक्या घेण्याच्या कामांनाही निधी वापरता येईल.

दुष्काळाचा परिणाम पशु-धनावर होऊ नये, यासाठी चारा छावण्यांमध्ये जनावरांसाठी टब आणि बकेट उपलब्ध करून देणे तसेच गोशाळांमध्ये शेड उभारण्याच्या कामांसाठीही निधी खर्च करता येणार आहे. प्राथमि क आरोग्य केंद्रे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरओ प्लांट किंवा वॉटर प्युरिफायर बसविणे आणि आवश्यक औषधांचा पुरवठा करण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

२५ लाखांपेक्षा अधिक कामासाठी विशेष बाब

एखाद्या आमदारा-ने २५ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चाचे किंवा विशेष स्वरूपाचे काम सुचविल्यास संबंधित प्रस्ताव जिल्हाधिकारी 'विशेष बाब' म्हणून नियोजन विभागाकडे पाठवू शकतील. प्रस्तावित कामामुळे होणारे फायदे तसेच त्यास मंजुरी दिल्यास सरकारवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे किंवा नाही, यासह आवश्यक सविस्तर माहिती प्रस्तावात नमूद करावी लागणार आहे. नियोजन विभागाच्या मान्यतेनंतर अशा प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करता येणार आहे.

# हिंगोलीत फटाक्याच्या गोदामाला भीषण आग; दोघांचा होरपळून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंगोली : शहरातील मारवाडी गल्लीत फटाक्याच्या गोदामाला भीषण आग (ऋळीश) लागल्याची घटना घडली. फटाक्याचे गोदाम असल्याने दारुगोळ्याचा स्फोट होऊन आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केलं. या आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची प्राथमि क माहिती आहे, तसेच १० ते १२ जण जखमी झाले आ-हेत. आगीबाबत माहिती मि ळताच, आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू हो-ते. मात्र, आग विझवण्यासाठी गेलेल्या अग्निशमन (ऋळीश लीळसरवश) दलाच्या गाडीलाच आग लागल्याचंही पाहायला मिळालं.

**१० ते १२ जखमी, परिसरात खळबळ**

शहरातील मारवाडी गल्ली म्हणजेच रहिवासी भागात इतक्या मोठ्या प्रमाणात फटाके ठेवल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आगीमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या आगीमुळे मोठ्या प्रमाणात फटाके फ ुटत आहेत, त्यामुळे आग विझवण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. आग नेमकी कशामुळे लागली? या आगीत किती नुकसान झालं? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, घटनास्थळी अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न युद्धपा-तळीवर सुरू आहेत. मात्र, या आगीच्या घटनेत २ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहेत तर १०-१२ जण जखमी झाले आहेत जखमींना हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर, मृत्यू झालेल्यांचे मृतदेह देखील रुग्णालयात आणण्यात आले आहेत. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून प्रशासन खडबडून जागे झाल्याचं पाहायला मिळत आहे.

दरम्यान, या दुर्घटनेत हिंगोली शहरा-तील ३ घरात आग लागली असून आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे, तर १०-१२ जण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. घरात फटाके असल्याने फटाक्यांना आधी आग लागली, त्यानंतर घरात आग भडकत केली. फटाक्यामुळे आग विझवायला अडथळा झाला होता, काहीच क्षणात आगीने रौद्ररूप धारण केले. फटाक्यांना नेमकं आग कशामुळे लागली हे अद्याप अस्पष्ट आहे. मात्र, घटनेनंतर अग्निशामक दलाच्या वतीने आग विझवण्याचे युद्ध पातळीवर प्रयत्न सुरु होते.

# 'एमपीएसी'वर कारवाईचा मार्ग मोकळा; मुख्यमंत्र्यांची राज्यपालांकडे शिफारस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यामध्ये सुरु असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष सदस्य यांच्याविरोधात संविधानाच्या कलम ३१७ प्रमाणे कारवाई करण्यासाठी समिती गठीत करण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे विनंती केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्यपालांना शिफारस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससी आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष, तसेच सदस्य यांच्याविरोधात संविधानाच्या कलम ३१७ प्रमाणे कारवाई करण्यासाठी समिती गठीत करण्याची विनंती राज्यपालांना केली आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेत समिती गठीत करून ३ महिन्यात अहवाल मागवून त्या निष्कर्षांच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती करणारी शिफारस राज्यपालांकडे सादर करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळामध्ये झालेल्या चर्चेदरम्यान आयोगाच्या अध्यक्षांना हटवण्यापूर्वी त्यांची चौकशी करावी लागते, असं सांगण्यात आलं होतं. त्यानुसार आयोगाचे अध्यक्ष, सदस्य यांच्याविरोधात कारवाई करण्यासाठी समिती स्थापन करावी, अशी विनंती देवेंद्र फडणवीस यांनी राज्यापालांना केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याचं निष्पन्न झालं आहे. तीन विद्यार्थ्यांना पेप-रचा लाभ झाल्याचं समोर आलं होतं. या तीन विद्यार्थ्यांसह इतर आरोपींना अटक करण्यात आली आहे. थेट म हाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेचा पेपर फुटल्यानं विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.यासाठी पुण्यात आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्त्वात पुण्यात आंदोलन सुरु आहे. याशिवाय राज्य सेवा मुख्य परीक्षेत बहुपर्यायी प्रश्न पॅटर्न की वर्णनात्मक प्रश्न पॅटर्नवरुन देखील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या भूमि का आहेत.

### अंतरिम आदेश सुद्धा नाही, निवडणूक आयोगाला नोटीस

### याचिकाकर्त्यांनी एसआयटी चौकशीची केली मागणी

# सुप्रीम कोर्टाचा ज्ञानेश कुमारांविरोधात तत्काळ कारवाईस नकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दाखल झालेल्या याचिकांवर कोणताही अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. सुप्रीम कोर्टाने केवळ वृत्तपत्रांच्या बातम्यांच्या आधारावर आम्ही कोणताही निर्णय घेऊ शकत नाही, किंवा त्या आधारावरती आम्ही आदेश देऊ शकत नाही असं म्हटलं. सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार यांना नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. न्यायालयाने त्यांना निलंबित करण्याचा आदेश देण्यासही नकार दिला. ज्ञा-नेश कुमार यांच्या विरोधात दाखल केलेल्या या याचिका विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) संबंधित निर्णयांच्या संदर्भात आहेत. असा आरोप आहे की, एसआयआरशी संबंधित सुमारे १४ निर्णय इतर दोन निवडणूक आयुक्तांच्या संमतीशिवाय घेण्यात आले. याचिकाकर्त्यांनी हे निर्णय रद्द करण्याची, ज्ञानेश कुमार यांच्यावर खटला चालवण्याची आणि एसआयआरमधून मतदारांची नावे वगळल्याबद्दल एसआयटी चौकशीची मागणी केली आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरून दूर करावे, अशीही त्यांनी मागणी केली आहे.






ही याचिका पाटणा येथील राकेश कुमार सिंह यांनी दाखल केली आहे. त्यात म्हटले आहे की, निवडणूक आयोग ही एक बहुसदस्यीय संस्था आहे आणि त्यामुळे तिचे निर्णय एकतर्फी घेतले जाऊ शकत नाहीत. विवादास्पद कृती घटनात्मक आणि कायदेशीर तत्त्वांनुसार करण्यात आली होती की नाही, हे निश्चित करण्यासाठी आयोगाच्या मूळ नोंदींची चौकशी करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. अंतरिम दिलासा म्हणून, याचिकेत ज्ञानेश कुमार यांना मुख्य निवडणूक आयुक्त (उएउ) पदावरून निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दुसऱ्या याचिकेतील मागण्या

डव्होकेट शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या या याचिकेत १४ एकतर्फी निर्णय रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र न्यायिक चौकशी आयोग स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, त्यात सायबर सुरक्षा आणि आयटी तज्ञांचा समावेश करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

प्रस्तावित चौकशीमध्ये एउख-छशीं आणि एठजछशीं डेटाबेसच्या फॉरेन्सिक ऑडिटची मागणी करण्यात आली आहे.

तसेच, एसआयआर (डखठ) दरम्यान ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून १३ कोटी नावे हटवण्याम ागील परिस्थितीची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

ज्ञानेश कुमार यांच्या व्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांवर कारवाईची म ागणी

या याचिकेत सक्षम प्राधिकरणाला लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० च्या कलम ३२ अंतर्गत तक्रार दाखल करून गुन्हा दाखल करण्याचे निर्दे श देण्याची मागणी करण्यात आली आहे. ही कारवाई ज्ञानेश कुमार, वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त मनीष गर्ग, महासंचालक (आयटी) सीमा खन्ना आणि जबाबदार आढळलेल्या इतर अधिकाऱ्यांविरुद्ध करण्याची मागणी करण्यात आली आहे. या याचिकेत कलम ३२ चा संदर्भ देण्यात आला आहे, ज्यात मतदार यादी तयार करणे, सुधारणे किंवा दुरुस्त करण्याशी संबंधित शासकीय कर्तव्याच्या उल्लंघनासाठी शिक्षेची तरतूद आहे.

## संपादकीय....

### दुष्काळ निवारणासाठी

राज्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर टंचाईग्रस्त भागांमध्ये तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी आमदार स्थानिक विकास निधीतून २५ लाख रुपयांपर्यंतचा निधी खर्च करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी नियोजन विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण तसेच नागरी भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईसह अन्य समस्यांवर स्थानिक पातळीवर तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी आमदार निधीतून ही कामे हाती घेण्याची मुभा देण्यात आली आहे. २५ लाख रुपयांच्या कमाल मर्यादित कामे मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या निधीतून टंचाईग्रस्त भागांत तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना सुरू करणे, नवीन नळ जोडण्या देणे, जुन्या पाणीपुरवठा योजना आणि पाईपलाइनची विशेष दुरुस्ती करणे, पाणीपुरवठा विहिरी खोल करणे व त्यातील गाळ काढणे, तसेच नवीन विंधन विहिरी आणि साध्या विहिरी बांधणे शक्य होणार आहे. पाणीसाठ्यासाठी प्लास्टिकच्या टाक्या बसविणे आणि नदीपात्रात बुडक्या घेण्याच्या कामांनाही निधी वापरता येईल. दुष्काळाचा परिणाम पशुधनावर होऊ नये, यासाठी चारा छावण्यांमध्ये जनावरांसाठी टब आणि बकेट उपलब्ध करून देणे तसेच गोशाळांमध्ये शेड उभारण्याच्या कामांसाठीही निधी खर्च करता येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरओ प्लांट किंवा वॉटर प्युरिफायर बसविणे आणि आवश्यक औषधांचा पुरवठा करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. एखाद्या आमदाराने २५ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चाचे किंवा विशेष स्वरूपाचे काम सुचविल्यास संबंधित प्रस्ताव जिल्हाधिकारी 'विशेष बाब' म्हणून नियोजन विभागाकडे पाठवू शकतील. प्रस्तावित कामामुळे होणारे फायदे तसेच त्यास मंजुरी दिल्यास सरकारवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे किंवा नाही, यासह आवश्यक सविस्तर माहिती प्रस्तावात नमूद करावी लागणार आहे. नियोजन विभागाच्या मान्यतेनंतर अशा प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करता येणार आहे.

## इन्स्टाग्राम प्रभावक: सोशल मीडियावर मोठा चाहतावर्ग निर्माते

**(६-१२ ऑक्टोबर:इन्स्टाग्राम स्थापन दिन सप्ताह.)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इन्स्टाग्रामची स्थापना दि.६ ऑक्टोबर २०१० रोजी केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रिगेर यांनी केली. इन्स्टाग्रामबद्दल महत्त्वाची माहिती अशी की, ॰ मूळ स्थान: सॅन फ्रान्सिस्को, अमेरिका. ॰ नाव कसे पडले? तर इन्स्टंट आणि टेलिग्राम या दोन शब्दांपासून ''इन्स्टाग्राम'' हे नाव तयार झाले. ॰ मालकी कंपनी: एप्रिल २०१२ मध्ये फेसबुक- आता मेटा प्लॅटफॉर्म्स कंपनीने इन्स्टाग्राम १ अब्ज अमेरिकन डॉलरला विकत घेतले. ॰ मुख्य उपयोग: फोटो आणि व्हिडिओ शेअर करणे. सदर माहितीपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत जी.... संपादक.

इन्स्टाग्राम हे ऑनलाईन आपण त्याने आपल्या मोबाईल मार्फत फोटो शेअर करण्याचे एक प आहे. मेटा प्लॅटफॉर्म्स कंपनी- पूर्वीची फेसबुक या पची मालक आहे. केविन शिस्ट्रोम आणि मॅक क्रीगर यांनी ऑक्टोबर २०१० साली याची निर्मिती केली होती. एप्रिल २०१२ मध्ये या पच्या वापरकर्त्यांची संख्या १० कोटी होती आणि डिसेंबर २०१४ला ती संख्या ३० कोटी झाली. हे प अँड्रॉइड, आयफोन, आयपॅड, नोकिया या ऑपरेटिंग सिस्टिमवर चालते. याला एप्रिल २०१२ फेसबुक कंपनीने १ अब्ज अमेरिकन डॉलरला विकत घेतले आहे.

इंस्टाग्राम ही मेटा प्लॅटफॉर्म्सच्या मालकीची एक अमेरिकन फोटो आणि शॉर्ट-फॉर्म व्हिडिओ शेअरिंग सोशल नेटवर्किंग सेवा आहे. हे वापरकर्त्यांना मीडिया अपलोड करण्याची परवानगी देते जे फिल्टर्ससह संपादित केले जाऊ शकते, हॅशटॅगद्वारे आयोजित केले जाऊ शकते आणि भौगोलिक टॅगिंगद्वारे स्थानाशी जोडले जाऊ शकते. पोस्ट सार्वजनिकरित्या किंवा पूर्व-मंजूर फॉलोअर्ससह शेअर केल्या जाऊ शकतात. वापरकर्ते टॅग आणि स्थानांनुसार इतर वापरकर्त्यांची सामग्री ब्राउझ करू शकतात, ट्रेंडिंग सामग्री पाहू शकतात, फोटो लाइक करू शकतात आणि इतर वापरकर्त्यांना फॉलो करून त्यांची सामग्री वैयक्तिक फीडमध्ये जोडू शकतात. मेटा-संचालित इमेज-केंद्रित सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, हे आइओएस, एंड्राइड, विण्डोज आणि वेबवर उपलब्ध आहे. वापरकर्ते फोटो काढू शकतात आणि अंगभूत फिल्टर्स आणि इतर साधनांचा वापर करून ते संपादित करू शकतात, त्यानंतर ते फ ेसबुकसारख्या इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करू शकतात. हे इंग्रजी, हिंदी, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी आणि कोरियनसह ३३ भाषांना समर्थन देते .

इन्स्टाग्राम हे फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी असलेले एक ऑनलाइन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि सोशल नेटवर्क सेवा आहे. हे प २०१० मध्ये सह-संस्थापकांनी सुरू केले होते. केविन सिस्ट्रॉम आणिमाईक क्रिगर यांनी याची स्थापना केली होती आणि आता ती फेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटा प्लॅटफॉर्म्स, इंकच्या मालकीची आहे. जगातील सर्वात मोठ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या इन्स्टाग्रामने २०२२ मध्ये दोन अब्ज मासिक सक्रिय वापरकर्त्यांचा टप्पा ओलांडला. कंपनीचे मुख्यालय कॅलिफोर्नियातील मेनलो पार्क येथे आहे.

तिहास: इन्स्टाग्रामची सुरुवात स्टॅनफोर्ड पदवीधर केविन सिस्ट्रॉम यांनी केली, जे पूर्वी गुगलमध्ये काम करत होते. त्यांची सुरुवातीची निर्मिती ''बर्बन' होती, जे नाव त्यांना व्हिस्की आणि बर्बनमध्ये असलेल्या आवडीमुळे देण्यात आले होते. फोरस्क्वेअर आणि इतर लोकेशन आधारित प्लॅटफॉर्मच्या लोकप्रियतेपासून प्रेरित होऊन, बर्बनने वापरकर्त्यांना फोटोंसोबत चेक-इन पोस्ट करण्याची परवानगी दिली, जे त्यावेळी सोशल पोस्टिंगचा एक अविभाज्य भाग नव्हते. सिस्ट्रॉम यांनी बर्बनसाठी व्हेंचर फंडिंग मिळवले आणि पुढे स्टॅनफोर्डचेच दुसरे पदवीधर माईक क्रिगर यांना सोबत घेतले, ज्यांनी ''म ीबो'' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काम केले होते. त्यांनी मोबाईल उपकरणांवर काढलेल्या फोटोंवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या संकल्पनेत बदल केला आणि त्याचे नाव बदलून इन्स्टाग्राम असे ठेवले.

: संवादात्मक माध्यमे आणि सेवा- मुख्य कार्यकारी अधिकारी: श्री. मार्क इलियट झुकरबर्ग- इस्लामविरोधी इंस्टाग्राम कमेंटनंतर झालेल्या परिणाम ांची व्याप्ती सेल्मा ब्लेअर यांनी उघड केली: माझं करिअरच संपलं होतं.

इन्स्टाग्राम हे फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी असलेले एक ऑनलाइन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि सोशल नेटवर्क सेवा आहे. हे प २०१० मध्ये सह-संस्थापकांनी सुरू केले होते. केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रिगर यांनी याची स्थ-ापना केली होती आणि आता ती फ ेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटा प्लॅटफॉर्म्स, इंकच्या मालकीची आहे. जगातील सर्वात मोठ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या इन्स्टाग्राम ने २०२२ मध्ये दोन अब्ज मासिक सक्रिय वापरकर्त्यांचा टप्पा ओलांडला. कंपनीचे मुख्यालय कॅलिफोर्नियातील मेनलो पार्क येथे आहे.

इतिहास :इन्स्टाग्रामची सुरुवात स्टॅनफोर्ड पदवीधर केविन सिस्ट्रॉम यांनी केली, जे पूर्वी गुगलमध्ये काम करत होते. त्यांची सुरुवातीची निर्मिती ''बर्बन'' होती, जे नाव त्यांना व्हिस्की आणि बर्बनमध्ये असलेल्या आवडीमुळे देण्यात आले होते. फोरस्क्वेअर आणि इतर लोकेशन आधारित प्लॅटफॉर्मच्या लोकप्रियतेपासून प्रेरित होऊन बर्बनने वापरकर्त्यांना फोटोंसोबत चेक-इन पोस्ट करण्याची परवानगी दिली, जे त्यावेळी सोशल पोस्टिंगचा एक अविभाज्य भाग नव्हते. सिस्ट्रॉम यांनी बर्बनसाठी व्हेंचर फंडिंग मिळवले आणि पुढे स्टॅनफोर्डचेच दुसरे पदवीधर माईक क्रिगर यांना सोबत घेतले, ज्यांनी ''म ीबो'' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काम केले होते. त्यांनी मोबाईल उपकरणांवर काढलेल्या फोटोंवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या संकल्पनेत बदल केला आणि त्याचे नाव बदलून इन्स्टाग्राम ठेवले. सिस्ट्रॉम आणि क्रीगर यांनी त्यांच्या प्रोटोटाइपमध्ये मिनिमलिझम- अतिसाधेपणाचा स्वीकार केला आणि प्रतिमा- फिल्टर जोडण्याच्या पर्यायासह टिप्पण्या आणि ''लाइक'' करण्याच्या वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित केले. या दोघांनी वेब आवृत्तीऐवजी एक आइओएस प तयार करण्याचा निर्णय घेतला, जे आयफोन-४ च्या खूप सुधारलेल्या छायाचित्रण क्षमतेचा पुरेपूर फायदा घेईल. त्यांनी काही महिन्यांतच पला अंतिम स्वरूप दिले आणि जुलै २०१० मध्ये प्लॅटफॉर्मवर पहिले फोटो पोस्ट केले. इंस्टाग्राम दि.६ ऑक्टोबर २०१० रोजी पलच्या प स्टोअरवर सर्वांसाठी खुले करण्यात आले आणि पहिल्याच दिवशी २५ हजार वापरकर्त्यांपर्यंत पोहोचले. तीन महिन्यांपेक्षा कमी काळातच त्याचे १० लाख वापरकर्ते झाले, जी एक अभूतपूर्व कामगिरी होती. इंस्टाग्रामची लोकप्रियता झपाट्याने वाढत गेल्याने, कंपनीने विविध गुंतवणूकदार आणि संभाव्य खरेदीदारांचे लक्ष वेधून घेतले. एप्रिल २०१२ मध्ये, सुरू झाल्यानंतर १८ महिन्यांनी, फेसबुकने इंस्टाग्रामला एक अब्ज डॉलर्स रोख आणि स्टॉकच्या स्वरूपात विकत घेतले . हे अधिग्रहण फेसबुकच्या प्रारंभिक सार्वजनिक भागविक्री -आयपीओच्या सुमारे एक महिना आधी झाले.

आणि वैशिष्ट्ये: इन्स्टाग्रामची सेवा तुलनेने सोपी आहे. ती प्रतिमा किंवा लहान व्हिडिओ असलेल्या पोस्टवर लक्ष केंद्रित करते. या पोस्ट वापरकर्त्याच्या प्रोफाइलमध्ये समाविष्ट असतात आणि त्या इन्स्टाग्रामवर सार्वजनिकरित्या किंवा वापरकर्त्याच्या फॉलोअर्सना खाजगीरित्या दाखवल्या जाऊ शकतात. पोस्ट करण्यासाठी दोन मुख्य मार्ग आहेत: वापरकर्त्याच्या कायमस्वरूपी फीडमध्ये किंवा त्यांच्या स्टोरीज मध्ये. स्टोरीज हा एक विशेष विभाग आहे, जिथे मजकूर (विशेषतः संग्रहित केल्याशिवाय) अदृश्य होण्यापूर्वी २४ तास राहतो. कॅमेऱ्यातून थेट प्लॅटफॉर्मवर व्हिडिओ प्रवाहित करून लाइव्ह जाणे देखील शक्य आहे.

खाजगी संदेशाद्वारे (ज्याला डायरेक्ट मेसेज म्हणतात) एकमेकांशी संपर्क साधू शकतात, जिथे ते कायमस्वरूपी फोटो किंवा व्हिडिओ किंवा क्षणिक फोटो किंवा व्हिडिओ स्नॅपचॅटप्रम ाणे शेअर करू शकतात. वापरकर्ते एकमेकांना 'फॉलो' करू शकतात आणि आपण फॉलो करत असलेली सर्व खाती एकाच फीडमध्ये एकत्रित केली जातात. हे प्लॅटफॉर्म विषय किंवा हॅशटॅगनुसार ब्राउझ करण्याची सुविधा देखील देते आणि वापरकर्ता लोकप्रिय पोस्ट्सचे यादृच्छिक मिश्रण पाहू शकतो. इन्स्टाग्राममध्ये पमध्येच फोटो किंवा व्हिडिओ काढण्याची, तसेच मजकूर, जीआयएफ, आयकॉन्स आणि फिल्टर्स वापरून नवीन किंवा आधीपासून असलेले फोटो किंवा व्हिडिओ संपादित करण्याची सुविधा आहे. या फिल्टर्सद्वारे विविध प्रकाश प्रभाव, विकृती, टोपी किंवा मांजरीचे कान यांसारखी इतर वैशिष्ट्ये जोडता येतात. मूळतः आयफोनच्या रुंदीमध्ये बसण्यासाठी प्रतिमा चौरस, म्हणजेच ६४० बाय ६४० पिक्सेलच्या असणे आवश्यक होते. तथापि सन २०१५ मध्ये आकारावरील निर्बंध १०८० पिक्सेलपर्यंत वाढवण्यात आले. फीड पोस्टमध्ये वापरकर्त्याचे कॅप्शन, जिओटॅगिंग डेटा किंवा इतर वापरकर्ता खात्यांशी जोडणारे टॅग असू शकतात. इतर वापरकर्त्यांना पोस्ट सहजपणे शोधता याव्यात यासाठी कॅप्शनमध्ये अनेकदा हॅशटॅगचा समावेश असतो. हे प्लॅटफॉर्म फीड पोस्टवर मजकूर टिप्पण्या जोडण्याची आणि वापरकर्त्यांना हार्ट आयकॉन वापरून पोस्ट ''लाइक'' करण्याची परवानगी देखील देते. स्टोरीजसाठी वापरकर्ते इमोजी आधारित प्रतिक्रिया पाठवू शकतात किंवा खा-जगी संदेशाद्वारे उत्तर देऊ शकता. ही सेवा वापरण्यासाठी विनामूल्य आहे आणि भगिनी कंपनी फेसबुकप्रमाणेच जाहिरातींमधून मोठ्या प्रमाणात महसूल मिळवते. सुरुवातीला फक्त पलच्या आयओएसवर उपलब्ध असलेल्या या सेवेच्या अँड्रॉइड- २०१२, वेब- २०१२, फायर ओएस- २०१४ आणि विंडोज १०- २०१६ साठी आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या .

प्रभाव आणि टीका: सेवेच्या लोकप्रियतेमुळे आणि स्वरूपामुळे अनेक जाहिरातदार इन्स्टाग्रामकडे आकर्षित झाले आणि इन्स्टाग्रामच्या युगाची सुरुवात करण्यास मदत झाली. प्रभावक- अशा व्यक्ती ज्यांनी सोशल मीडियावर मोठा चाहतावर्ग निर्माण केला आहे आणि त्या प्रभावाचा वापर विशिष्ट उत्पादने किंवा सेवांची जाहिरात करण्यासाठी करतात. ब्रँड्स अनेकदा प्रभावकांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांच्या पोस्ट किंवा व्हिडिओंमध्ये माहिती किंवा परीक्षणे पोस्ट करण्यासाठी किंवा एखाद्या उत्पादनाचा उल्लेख करण्यासाठी त्यांना आर्थिक मोबदला आणि मोफत उत्पादने मिळू शकतात. त्याच्या प्रचंड वाढीमुळे आणि लोकप्रियते मुळे मोठ्या प्रमाणावर प्रशंसा होत असली, तरी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला ग्रासणाऱ्या समस्यांमुळे इंस्टाग्रामवर टीकाही होत आहे- १ अयोग्य सामग्री, २ चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती, आणि ३ अपुरे नियंत्रण. अभ्यासातून असेही दिसून आले आहे की याचा किशोरवयीन मुला-मुलींच्या मानसिक आरोग्यावर हानिकारक परिणाम होऊ शकतो, विशेषतः तरुण मुलींच्या आत्मविश्वासावर याचा परिणाम होतो. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय इन्स्टाग्राम स्थ-ापन दिनाच्या सप्ताहभर समस्त युजर्संना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**-संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**दनविशेषकार)**
**. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**क्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## पोलिसांकडून चार आरोपींना अटक, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला वेग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पत्रकार बबन चव्हाण यांच्यावर झालेल्या मारहाण प्रकरणात सांगोला पोलिसांनी मोठी कारवाई करत चार आरोपींना अटक केली आहे याप्रकरणी सांगा पोलीस ठाण्यात ग.रा.न.८४६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम११८/(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर सांगोला पोलिसांनी तप-ासाची चक्री गतिमान करत या प्रकरणातील आरोपी निष्पन्न केले त्यानंतर बालाजी बबन चव्हाण राहणार (वाकी,) राजेंद्र दत्तात्रेय बोंद्रे (,रा. एकतपुर) अजय भीमराव चव्हाण (राहणार एकतपुर )आणि आबा शिवाजी चव्हाण (राहणार एकतपुर) प्रचार आर-ोपींना अटक करण्यात आली आहे.

महान प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपींना शोध घेतला व तपासांती आर-ोपी निष्पन्न झाल्यानंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करत अटक करण्यात आली यामुळे या प्रकरणाचा पुढील तपासाला वेळ झाला आहे.

कारवाई सांगोला पो-लीस ठाण्याचे वरिष्ठ पो-लीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक सतपाल कांबळे पोलीस उपनिरीक्षक संदीप गुरव पोलीस हेडकॉन्स्टेबल क्रमांक २३८ नवनाथ सावंत आणि पो-लीस कॉन्स्टेबल गणेश काळे यांनी केला.

पत्रकार बबन चव्हाण म ारहाण प्रकरणात अवघ्या तासात दरम्यान चार आरोपींना निष्पन्न करून अटक करण्यात आल्याने सांगोला पोलिसाकडे लक्ष वेधले गेले आहे. या प्रकरणात पुढील तपास सुरू असताना तपासातून आणखी काही बाबी समोर येतात का याकडे लक्ष लागले आहे.

## कळंब येथील ज्ञानेश्वर बालक आश्रमात अभिजात मराठी भाषा गौरव दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील संत ज्ञानेश्वर बालक आश्रम येथे अभिजात मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम प्रसिद्ध गझलकार प्रा. शेखर गिरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रम ुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, माधव सिंग राजपूत, मुख्याध्यापक बापूराव भंडारे, बाळासाहेब कांबळे, नवनाथ अडसूळ, के.पी. अभंग, संत ज्ञानेश्वर संचालिका सरस्वती अडसूळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मराठी भाषेला समृद्ध करणारे ज्ञानेश्वरी, लिळा चरित्र,विवेक सिंधू, गाथा, दासबोध, दासोपंताची पासोडी या ग्रंथांची

पूजा करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध कवी गझलकार प्रा.शेखर गिरी यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा विकास वेगाने होईल तसेच पुरातन वारसा, संशोधन संस्थात्मक यंत्रणा यासाठी केंद्र शासनाच्या निधीचा फायदा होणार आहे असे सांगून त्यांनी यावेळी मराठी भाषेचे घट्ट नाते प्रेम व अभिमान व्यक्त करणाऱ्या कवींच्या ओळी ... कोठे शोधू नका माझ्या रक्तात सळसळते म राठी..... काही एक भाषेची सवय ओठास माझ्या तरी ....काळजात भिडते माय मराठी! या काव्यपंक्ती सादर केल्या तर प्रम ुख पाहुणे महादेव महाराज अडसूळ यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि मराठी भाषिक अस्मितेचा अभिमानास्पद गौरांकित ओळखीचा प्रचार , प्रसार जन माणसांमध्ये रुजावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असे सांगितले या कार्यक्रम ात बालकवी अश्रुबा कोठावळे यांनी मराठी भाषेचा महिमा सांगणारी कविता सादर केली. मुख्याध्यापक बापूराव भंडारे, यांनी मराठी भाषा मातृ भाषा आहे शिकू बोलू शकतो व स्पर्धात्मक परीक्षेत सुद्धा यश मिळवता येते यासाठी म राठी माध्यम शाळेमधुन प्राधान्याने शिक्षण घेणे काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात माधवसिंग राजपूत यांनी अभिजात मराठी भाषेचा दर्जा मिळावा म्हणून दहा वर्षाच्या प्रयत्नातून व सादर केलेल्या पुराव्यातून ३ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी अभिजात मराठी भाषा म्हणून दर्जा मिळाला व गौरव झाला असे सांगितले, आभार प्रदर्शन सहशिक्षक बाळासाहेब कांबळे यांनी मानले.

**पुणे, संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभागांसाठी उमेदवार देण्याचा संघटनेचा निर्णय; सोमवारी-मंगळवारी अर्ज भरण्याचे नियोजन**

## राज्यातील सर्व शिक्षक व पदवीधर निवडणुकीत उतरण्याचा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचा एकमुखी निर्णय - शिक्षक-पदवीधर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब :प्रतिनिधी , सुधाकर रणदिवे , महाराष्ट्रातील आगामी शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस श्री. संतोष भोजने यांनी दिली. संघटनेच्या ऑनलाईन राज्यस्तरीय बैठकीत याबाबत चर्चा होऊन पुणे, संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर या मतदारसंघांमध्ये उमेदवार देण्याचा निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीस संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री. अनिल नाचपल्ले, प्रदेश सरचिटणीस श्री. संतोष भोजने, म हिला प्रदेशाध्यक्ष श्रीमती रेखा सुडे,म हिला कार्याध्यक्ष सौ. दिव्या जाधव, राज्य कार्याध्यक्ष श्री. बबन चव्हाण, राज्य कोषाध्यक्ष श्री. संजय भोईर आणि राज्य संघटक श्री. प्रशांत शेवाळे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध विभागांचे पदाधिकारी उप-स्थित होते.

बैठकीमध्ये संबंधित म तदारसंघांसाठी उमेदवारीबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली. त्यानंतर पुणे, संभाजीनगर, अमरावती व नागपूर येथील निवडणुकांमध्ये संघटनेच्या वतीने उम ेदवार देण्यास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी एकमताने मान्यता दिल्याचे संघटनेने कळविले आहे. येत्या सोमवार आणि मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली.

संघटनेच्या प्रसिद्ध माहितीनुसार, राज्यातील विविध जिल्ह्यांचे व विभागांचे पदाधिकारी बैठकीत सहभागी झाले होते. त्यामध्ये श्री. राजन पाटील, श्री. अर्जुन जाधव, श्रीमती प्रतिभा पगार, श्री. लक्ष्मण दावणकर, श्री. हिरालाल पाटील, श्री. संजय मळभागे,लातूर श्री. सुखदेव भालेकर,धाराशिव श्री. राजेंद्र खैरनार, श्री. पंकज पाटील, श्री. अभय पाटील, श्री. सचिन रासवे, श्री. शंकर अटके, श्री. दशरथ शिंगारे,परभणी श्री. संतोष चव्हाण, सौ. लीना माने, श्रीमती संगिता सुरवते, श्री. लहू राक्षे, (हिंगोली )श्री. सचिन गडपतवार, श्री चेंटपल्ले (लातूर जिल्हाध्यक्ष )श्री. प्रमोद आटोळे आणि श्री. धनाजी घरत आदींचा समावेश असल्याचे नमूद आहे.

तसेच कोकण विभागातील पदाधिकाऱ्यांमध्ये श्री. विद्याधर पाटील, सौ. दिव्या गायकर, सौ. वृषाली राऊळ, श्री. प्रसाद फडके, श्री. दशरथ शिंगारे, श्री. उमेश पाटील, श्री. गोरख आघाव, श्री. रवींद्र पाटील आणि श्री. भरत गुरव यांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. पश्चिम व उत्तर महाराष्ट्र, तसेच मराठवाडा विभागातील विविध जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची नावेही संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकात देण्यात आली आ-हेत.

शिक्षक व पदवीधर म तदारसंघातील निवडणूक प्रक्रियेत संघटनेच्या माध्यमातून सहभाग नोंदविण्याचा निर्णय राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात आला आहे. संबंधित मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया नियोजित वेळेत पूर्ण केली जाईल, अशी माहिती प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने यांनी दिली.

**- राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दक्षता समितीच्या सदस्यांची माहिती दर्शविणारे बोर्ड प्रत्येक पोलीस ठाण्यात लावावेत

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे समाज कल्याण विभागाला निर्देश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय दक्षता व नियंत्रण समित्यांच्या सदस्यांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध व्हावी, यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात समितीच्या सदस्यांची नावे दर्शविणारे डिजिटल बोर्ड लावण्याबाबत समाज कल्याण विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय दक्षता व नियंत्रण समितीतील शासकीय अधिकारी-कर्मचारी तसेच अशासकीय सदस्य हे लोकसेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी परस्परांमध्ये योग्य समन्वय ठेवून पीडितांना शासनाच्या योजनांचा व कायद्यानुसार मिळणाऱ्या लाभांचा तातडीने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

समितीतील सर्व अशासकीय सदस्यांना संबंधित कायदे, नियम, शासन निर्णय तसेच समितीच्या कामकाजाची सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. सदस्यांना संबंधित कायदे व तरतुदींची योग्य माहिती असल्यास ते पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तालुकास्तरीय दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्यांची निवड आदर्श आचारसंहितेनंतर करण्यात येणार असल्याने समाज कल्याण विभागाने त्यादृष्टीने आवश्यक नियोजन करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

जिल्ह्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत दि. ३१ डिसेंबर २०२५ अखेरची ४९ प्रकरणे प्रलंबित होती. दि. १ जानेवारी २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत एकूण २२४ प्रकरणे दाखल झाली असून, एकूण २७३ प्रकरणांपैकी २२४ प्रकरणांमध्ये कार्यवाही करण्यात आली आहे. सध्या ४९ प्रकरणे प्रलंबित असून, त्यापैकी शहर पोलीस विभागांतर्गत ६ तर ग्रामीण पोलीस विभागांतर्गत ४३ प्रकरणे प्रलंबित आहेत. पोलीस विभागाकडे तपासासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये तातडीने तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल करावे व त्याबाबतची माहिती समाज कल्याण विभागास सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठकीत पोलीस विभागाकडे दाखल व तपासावर प्रलंबित प्रकरणे, सप्टेंबर २०२६ अखेर दाखल झालेली खून व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची प्रकरणे, न्यायालयीन निर्णयासाठी प्रलंबित प्रकरणे तसेच अर्थसहाय्याच्या मंजुरीसाठी प्राप्त प्रस्ताव आणि उपलब्ध निधीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या.

गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांतील प्रकरणांमध्ये पोलीस विभाग व समाज कल्याण विभागाने संबंधित दक्षता समितीच्या सदस्यांना आवश्यक माहिती द्यावी, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

शेटफळ, ता. मोहोळ येथील एका प्रकरणात पीडिताच्या घराचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी विशेष बाब म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी समाज कल्याण विभागाला दिले.

प्रारंभी समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीअंतर्गत विविध प्रकरणांची माहिती बैठकीत सादर केली.

दरम्यान, अशासकीय सदस्यांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात तालुका व जिल्हास्तरीय दक्षता व नियंत्रण समितीतील अशासकीय सदस्यांची नावे दर्शविणारे डिजिटल बोर्ड लावण्यात यावेत, अशी मागणी केली. तसेच गुन्हा करून फरार असलेल्या आरोपींच्या अटकेसाठी पोलीस विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणीही सदस्यांनी केली.

यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड तसेच अशासकीय सदस्य अरुण क्षीरसागर, विजय बनसोडे, मोहन गायकवाड, सुदर्शन यादव, जितेंद्र बनसोडे यांच्यासह शहर पोलीस विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## नंगपुरामुर्री शासकीय निवासी शाळेत विविध स्पर्धा व उपक्रम साजरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत सेवा संकल्प अभियान दि. १७ सप्टेंबर ते १७ आक्टोबर या कालावधीत संपन्न होत आहे. या दरम्यान सदर शाळेत विविध उपक्रम आणि स्पर्धा राबवून सेवा संकल्प अभियान साजरा करण्यात आला.

यावेळी दि. १७ सप्टेंबरला शालेय परिसरात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व पोषण तपासणी शिबीर आयोजित करुन आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. दि. १९ सप्टेंबरला शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा विकसित भारत किंवा माझ्या स्वप्नातील भारत या विषयावर वर्ग सहावी ते दहावीमधील एकुण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली. दि.

### सेवा संकल्प अभियान उत्सफूर्त : आनंदाने विद्यार्थ्यांचा सहभाग

२२ सप्टेंबर सप्टेंबरला विकसित भारत या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली यामध्ये याच शाळेतील ३३ विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नातील विकसित भारत रंगविले. २४ सप्टेंबर शालेय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून अनेक वेगवेगळ्या प्रजातीच्या रोपट्यांची लागवड केली. २६ सप्टेंबरला शालेय परिसर स्वच्छ करत स्वच्छता अभियान राबवून समृद्ध केले.

०२ आक्टोबर यादिवशी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपली मते मांडून विचारावर प्रकाश टाकला. अशाप्रकारे ही शाळा सेवा संकल्प अभियान साजरा करुन मोलाचा संदेश समाजात प्रचलित केला.

अभियान यशस्वी करण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे, पुष्कराज लांजेवार, मुन्नाभाई नंदागवळी, साधना पारधी, आशिष शहारे, प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, निशा गभणे यांनी परिश्रम घेतले.

## मंत्री मा.छगनराव भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त माणुसकी फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय कवी संमेलनाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कविता हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील वास्तव, वेदना, संघर्ष आणि आशा व्यक्त करणारे प्रभावी माध्यम आहे. कवी आपल्या लेखणीतून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत असतात. महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या कार्यातून समाजाला परिवर्तनाची दिशा दिली. वाढदिवसानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कवी संमेलनाचे उद्घाटन माजी खासदार समीर भुजबळ यांच्या हस्ते उत्साहात झाले, याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी समीर भुजबळ म्हणाले की, नाशिक जिल्ह्यासह येवला व निफाड परिसरातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे वाढदिवस हा केवळ उत्सवाचा प्रसंग न राहता समाजासाठी योगदान देण्याची संधी म्हणून साजरा करण्याचा प्रयत्न आहे. वाढदिवसानिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी व गरजू नागरिकांना शक्य तितकी मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा असून पावसाअभावी शेती उत्पादनावर परिणाम होत आहे. या परिस्थितीत शासनाच्या मदतीसोबतच सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि समाजातील विविध घटकांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक बांधिलकीतून अधिकाधिक सहकार्य करण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.




सामाजिक बांधिलकी, साहित्य आणि माणुसकीचा संदेश देणाऱ्या या संमेलनाला महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवी व रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कवी संमेलनात महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवींनी सहभाग घेतला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, सामाजिक परिवर्तन, दुष्काळ, शेतकऱ्यांचे प्रश्न, माणुसकी व सामाजिक बांधिलकी यांसह विविध विषयांवरील कवितांचे सादरीकरण करण्यात आले. प्रभावी काव्यवाचनाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

यावेळी नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे,तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, भाऊसाहेब बोचरे, शिवाजीराव ढेपले, आण्णासाहेब बोरगुडे,पांडुरंग राऊत, कवी बाळासाहेब गिरी, सागर निकाळे, आरती निकाळे, कवी राजेंद्र सोमवंशी, कवी प्रशांत केंदाळे, सम्राज्ञी सूर्यवंशी यांच्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले कवी, साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्तविक व आभार प्रदर्शन माणुसकी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सागर निकाळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अश्विनी सांगळे यांनी केले.

त्यांचे विचार साहित्य व कलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे मत माजी खासदार समीर भुजबळ यांनी व्यक्त केले.

माणूसकी सामाजिक फाउंडेशन, निफाड यांच्यावतीने मंत्री छगन भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या

### एमआयटीत रामभाऊ जोशी - जीवन प्रवास चरित्रग्रंथाचे प्रकाशन

# नि:स्पृह पत्रकार व निगर्वी व्यक्तिमत्व रामभाऊ जोशी : डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे विचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे, ५ ऑक्टोबर: पत्रकारितेतील प्रदीर्घ पर्व म्हणजे रामभाऊ जोशी . सात दशकांचा त्यांचा काळ आदर्श, अभ्यासू आणि निकोप होता. पत्रकारिता त्यांचा श्वास आणि ध्यास होता. त्यांची ओळख ही निःस्पृह पत्रकार व निगर्वी व्यक्तिमत्व अशी होती, असे विचार माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

अनिल जोशी लिखित रामभाऊ जोशी - जीवन प्रवास या चरित्रग्रंथाचे प्रकाशन डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते एमआयटी डब्ल्यूपीयू च्या संत ज्ञानेश्वर सभागृहात करण्यात आले. या वेळी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. उल्हासदादा पवार आणि रामभाऊ जोशींचे बंधू व या चरित्रग्रंथाचे लेखक अनिल जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित होते.

तसेच एमआयटीचे वरिष्ठ सल्लागार



डॉ. एस. एन. पठाण, प्रा. मिलिंद पात्रे, विश्वास जोशी, संवित पेंडसे, पश्यंती जोशी, उज्ज्वला भालेराव, राधा जोशी, चैतन्य जोशी, ऋता कांटे, आनंद जोशी, स्नेहा जोशी, अजित जोशी, स्वाती जोशी उपस्थित होते.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,रामभाऊ एक उत्तम पत्रकार, कुशल संघटक, लेखक, नाट्यसंगीत जाणकार, आस्वादक आणि कार्यकर्ते होते. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात क्रियाशील होते. सेनापती बापट मार्गालगत पत्रकारनगर स्थापनेमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. हसतमुख, हजरजबाबी, निर्गवी रामभाऊ हे होतकरू पत्रकारांचे मार्गदर्शक होते.

डॉ. उल्हासदादा पवार म्हणाले, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात रामभाऊंनी पत्रकारितेच्या सात दशकांत अनेक स्थित्यंतरे पाहिली. निःस्पृह व परखडपणे ते भाष्य करत राहिले. अशा पत्रकारितेची आज आवश्यकता आहे.

अनिल जोशी म्हणाले, बुद्धिमान, प्रेमळ, जाणकार, निरपेक्ष, व्यासंगी असे अनेक गुणवैशिष्ट्य असलेले व्यक्तिमत्व मला भाऊ म्हणून लाभणे व त्यांच्या चरित्र लिखाणाची संधी मिळणे, हे माझे भाग्य आहे. त्यांचे चरित्र अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल.

सूत्रसंचालन भागवत बिऱ्हाडी व आभार डॉ. महेश थोरवे यांनी मानले.

## राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत कर्मयोगी विद्यानिकेतन चे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत येथील श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मवीर विद्यानिकेतन प्रशालीतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळांचे प्रदर्शन करत घवघवीत यश संपादन केले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत बसलेच्या विद्यार्थ्यांनी एक सुवर्ण, एक रोप्य आणि पाच कास्य एकूण सात पदके पटकावली आहेत.

या स्पर्धेत आयुष्य गवळी यांनी सुवर्णपदक पटकावून प्रचालीच्या शिरपेचात मानाचा तुरा लावला आहे. तसेच नेहा घोडके हिने चमकदार कामगिरी करत रोपे पथकावर आपले नाव कोरलेले आहेत तर तैमूर शेख स्वराली घोडके वेदांत जाधव सुरेश येडगे आणि सौरभ येडगे या पाचही विद्यार्थ्यांनी कास्य स्पर्धक मिळवून शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे.

ा सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विकास रितोंड आणि विकास कदम सर यांचे मोलाचे मार्गदर्शन दाबले तसेच या स्पर्धेच्या तयारीसाठी प्रचारी केली तर सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विशेष सहकार्य केले असले की माहिती विद्यानिकेतनच्या प्राचार्य सौ प्रियदर्शनी सर देसाई मॅडम यांनी दिली.

या दीदी प्रमाण कशाबद्दल स्पर्धेचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले व त्यांचे पुढील क्रीडा प्रवाह प्रवासासाठी त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या व या सत्कार आणि शुभेच्छा सोहळ्याप्रसंगी संस्थेचे रजिस्टर गणेश वाळके यांच्यासह प्रचालीतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्व तरातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# ऊसतोड कामगारांना शासन निर्देशानुसार सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

## साखर कारखान्यांनी वर्षभरातील अपघातांची माहिती समाज कल्याण विभागाकडे सादर करावी; जिल्हाधिकारी - एस. कार्तिकेयन यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर ऊसतोड कामगारांना शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांच्या वर्षभरातील अपघातांची संपूर्ण माहिती समाज कल्याण विभागाकडे सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.




जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आयोजित लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी मार्गदर्शन करत होते. यावेळी समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपूरवाड, प्रादेशिक सह आयुक्त साखर यांचे प्रतिनिधी तसेच साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी साखर कारखान्यांनी कामगारांची योग्य नोंदणी करणे, निवासाची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कामगारांच्या मुलांसाठी शाळा, शिक्षण तसेच आवश्यक त्या इतर सुविधा उपलब्ध होतील, यासाठी संबंधित साखर कारखान्यांनी नियोजन करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

प्रत्येक साखर कारखान्यावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे-

ऊसतोड कामगारांच्या आरोग्याची नियमित तपासणी होण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने प्रत्येक साखर कारखान्यावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. या शिबिरांमध्ये जास्तीत जास्त ऊसतोड कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, यासाठी साखर कारखाने, संबंधित विभाग आणि स्थानिक यंत्रणांनी समन्वयाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

ऊसतोड कामगारांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या आरोग्य, निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छता, मुलांचे शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने शासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी आणि साखर कारखान्यांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

**२७ अपघात प्रकरणे प्राप्त; १७ प्रस्ताव कागदपत्रांच्या पूर्ततेसह**

समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी ऊसतोड कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अपघात अनुदान योजनेची माहिती दिली. जिल्ह्यातील एकूण ३८ साखर कारखान्यांपैकी १७ साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांच्या अपघातासंदर्भातील माहिती समाज कल्याण विभागाकडे सादर केली आहे. या अनुषंगाने एकूण २७ प्रकरणे प्राप्त झाली असून, त्यापैकी १७ प्रकरणांतील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे. या परिपूर्ण प्रकरणांना नियमानुसार मंजुरी द्यावी, असे सहाय्यक आयुक्त श्रीमती सोनवणे यांनी बैठकीत सांगितले.

# प्रारंभ प्रतिष्ठानच्या ढोल ताशा पथकाचा कौतुक सोहळा साजरा : नगरसेविका संगीता जाधव परिवाराचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर :प्रारंभ प्रतिष्ठान संचलित सोलापूरचा महागणपती व प्रारंभ ढोल-ताशा पथक यांच्या वतीने गणेशोत्सव २०२६ निमित्त आयोजित महाप्रसाद सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.तसेच संत रोहिदास मंगल कलशाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी महापालिका सभागृह नेते श्री.नरेंद्र काळे, उद्यान सभापती श्री. राजशेखर पाटील, महिला व बालकल्याण सभापती जंगम, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, गायकवाड ,मृण्मयी गवळी,भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष श्री. प्रवीण कांबळे, उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब सुरवसे, ज्येष्ठ पत्रकार श्री. दशरथ वडतिले , कुमठे येथील वारकरी संप्रदायातील प्रमुख महादेव वाघमारे , समाजसेवक सचिन कांबळे, विजय




शिखरे, किरण लोंढे अस्तित्व मेकर्सचे प्रमुख, भाजपा पदाधिकारी सुजाताताई शास्त्री, गीता पाटोळे, पडसलगी, मार्केट यार्ड कमिटीचे उद्योजक विशाल गायकवाड , किरण वाजपेयी , रविकांत व्हनकोळे ,पत्रकार संतोष कासे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

अ प्रारंभ ढोल-ताशा पथकाने गणेशोत्सवात दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल पथकातील सर्व सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार दशरथजी वडतीले यांनी केले. गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व सदस्यांचे, कार्यकर्त्यांचे, नागरिकांचे आणि गणेशभक्तांचे प्रारंभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष आकाश जाधव यांनी मनःपूर्वक आभार मानले.

श्रींच्या आशीर्वादाने सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्याची ही वाटचाल अशीच अविरत सुरू राहो, हीच गणरायाच्या चरणी प्रार्थना,अशी सदीछ्या नगरसेविका संगीता जाधव यांनी व्यक्त केल्या.

# शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ साठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मौल्यवान अलंकारांची गाठवणी पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने विविध स्तरांवर पूर्वतयारीला वेग देण्यात आला आहे. नवरात्र महोत्सवादरम्यान श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस विविध पारंपरिक पोशाख व धार्मिक विधींनुसार परिधान करण्यात येणारे पारंपरिक व मौल्यवान सुवर्ण अलंकार अत्यंत महत्त्वाचे असतात. या अलंकारांची सुरक्षित



गाठवणी, तपासणी व आवश्यक ती पूर्वतयारी नवरात्र महोत्सवापूर्वी पूर्ण करणे आवश्यक असते.

त्यानुसार दि. २७ सप्टेंबर २०२६ ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या विविध मौल्यवान अलंकारांची गाठवणी करण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आले आहे. अलंकारांची सुरक्षितता, त्यांची नोंद, जतन तसेच पुढील धार्मिक कार्यक्रमांसाठी आवश्यक नियोजन याबाबत विशेष काळजी घेण्यात आली आहे. शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ ची तयारी जोमाने सुरू करण्यात आली असून, भाविकांना नवरात्रोत्सवाचा धार्मिक व भक्तिमय अनुभव सुरळीतपणे घेता यावा, यासाठी मंदिर व्यवस्थापनाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती व्यवस्थापक श्री. प्रवीण कुमार घम यांनी दिली.

# मंगलमूर्ती गणेशोत्सव मंडळाकडून शाळेच्या रंगकामासाठी ५ हजारांची मदत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : श्री मंगलमूर्ती गणेशोत्सव मंडळ, टाकळीवाडी यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत यंदाच्या गणेशोत्सवातून जमा झालेल्या वर्गणीमधून विद्या मंदिर, टाकळीवाडी शाळेच्या रंगकामासाठी ५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून केवळ धार्मिक उत्सव साजरा न करता सामाजिक उपक्रमांना हातभार लावण्याचा मंडळाचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. शाळेच्या रंगकामासाठी मदत केल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुंदर व प्रसन्न वातावरण मिळण्यास मदत होणार आहे. मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकीचा हा उपक्रम राबविल्याबद्दल ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापनाकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

# ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात; कळंब तालुक्यात १२० वर्षीय आजींसह तीन शतायुषींचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने कळंब तालुक्यात १०० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या वृद्धांचा घरोघरी जाऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी भाटशिरपुरा येथील त्रिवेणीबाई श्रीरंग गायकवाड या १२० वर्षे वय असलेल्या आजींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जिल्हाध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वयातही त्यांची स्मरणशक्ती चांगली असून त्यांचे चिरंजीव जालिंदर गायकवाड, सून, नातसून अशा तीन पिढ्या एकत्र नांदत आहेत.

यावेळी अडसूळ महाराज म्हणाले, ज्येष्ठ नागरिक ही कुटुंबाची आणि देशाची संपत्ती आहे. त्यांचा आदर करणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हे आपले कर्तव्य आहे. एकाकी जीवन



जगणाऱ्या ज्येष्ठांना समाजाने मदतीचा हात द्यावा.

त्यानंतर पिंपळगाव डोळा येथे देविदास कळसे-लोहार (वय १००) यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे त्यांच्या कुटुंबात कोणीही सदस्य नाही, तरीही ते मोठ्या जिद्दीने स्वतःचे सर्व व्यवहार स्वतः करतात. गावातील सुरेश टेकाळे परिवार त्यांची विचारपूस करतो, अशी माहिती त्यांनी दिली.

त्यानंतर त्याच गावातील गणपतराव दादाराव टेकाळे पाटील (वय १०५) यांनी नुकतीच १०५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचाही सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

या उपक्रमावेळी कल्याण खापे, माणिकराव लोहार, सुरेश टेकाळे, गुलाब बागवान, बशीर पठाण, निवृत्ती हौसलमल, माधवसिंग राजपूत, मुकुंद साखरे, उत्तरेश्वर शिंगणापूरे, यशवंत हौसलमल, पोपटराव मोदी यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निराधार बालकांसाठी आळंदीहून आली आरोग्याची गंगा; 'आपलं घर'मध्ये मोफत आरोग्य तपासणी व उपचार**

# आई वडीलांची माया नाही, पण माणुसकीची ऊब मिळाली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : आई-वडिलांच्या मायेपासून वंचित असलेल्या निराधार बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आळंदी येथील संत चोखामेळा आरोग्य केंद्राने नळदुर्ग येथील 'आपलं घर' बालगृहात धाव घेतली. सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीच्या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरात बालकांसह सुमारे १०० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन धाराशिव व लातूर जिल्हा बालकल्याण समितीचे सदस्य तथा पत्रकार दयानंद काळुंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संत चोखामेळा आरोग्य केंद्राचे अधीक्षक डॉ. विजय महाजन आणि 'आपलं घर' व्यवस्थापन समितीचे सचिव गोरख जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.



बालकांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांना वेळेवर उपचार मिळावेत आणि आई-वडिलांची उणीव त्यांच्या मनाला सतत जाणवू नये, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात 'आपलं घर'मधील ८० बालकांसह कर्मचारी अशा सुमारे १०० जणांची रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. तसेच डोळे, दात, कान-नाक-घसा, त्वचा, रक्तदाब, मधुमेह आदींची तपासणी करून आवश्यक औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.

याचवेळी वृध्दांवन फाऊंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील यांच्या वतीने 'आपलं घर'मधील ८० बालकांना 'श्यामची आई' या संस्कारक्षम पुस्तकाचे वाटप करण्यात आले. आरोग्य तपासणीसोबतच मुलांच्या हातात पुस्तक देऊन त्यांच्या मनाला विचारांची आणि संस्कारांची शिदोरी देण्याचा हा उपक्रम ठरला.

**'ही आरोग्यसेवा नव्हे, माणुसकीची गंगा'**

यावेळी बोलताना दयानंद काळुंके म्हणाले, या मुलांना आई-वडिलांची माया मिळाली नाही, ही त्यांची चूक नाही. मात्र समाजाने त्यांना मायेची ऊब देणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे आणि त्यांना आपण एकटे नाही, अशी भावना देणे हेच खरे सामाजिक कार्य आहे. आळंदीहून 'आपलं घर'पर्यंत आलेली ही आरोग्यसेवा म्हणजे केवळ तपासणीचे शिबिर नसून माणुसकीची आरोग्यगंगा आहे,

सामाजिक जाणिवेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे बालकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. अशा उपक्रमांतून समाजातील संवेदनशील व्यक्तींनी निराधार बालकांच्या पाठीशी उभे राहण्याची प्रेरणा घ्यावी, अशी भावना दयानंद काळुंके यांनी यावेळी व्यक्त केली

या शिबिरात डॉ विजय महाजन, सौदागर भोसले यांनी आरोग्य तपासणी व उपचार केले. कार्यक्रमाचे संयोजन साथी संतोष बुरंगे यांनी केले होते

शिबिराच्या यशस्वीतेसाठी 'आपलं घर'चे अधीक्षक संदीप चवले, स्मिता फडणीस, सविता अवचार, उमादेवी स्वामी, अरुणा कानडे, अर्चना देडे आणि विश्वनाथ कानडे यांनी पुढाकार घेतला होता

# उंबडगा बु येथे पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी /अमर जाधव : औसा तालुक्यातील उंबडगा बु. येथे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतपिकांवर झालेल्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर उंबडगा बु शिवारात पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली आहे. ग्राम महसूल अधिकारी अविनाश शेडोळकर, ग्राम पंचायत अधिकारी शिंदे मॅडम. कृषी सहाय्यक कंदले . सह प्रशासनाच्या माध्यमातून प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करण्यात येत आहे.

पंचनाम्यादरम्यान बाधित क्षेत्र, पिकाचा प्रकार व नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद केली जात असून, प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक माहिती संकलित करण्यात येत आहे. पंचनामा



हा पुढील शासकीय मदत व नुकसानभरपाईच्या प्रक्रियेसाठी महत्त्वाचा आधार ठरणार आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती संबंधित पथकाला उपलब्ध करून देऊन पंचनामा प्रक्रियेत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**महसूल अधिकारी शेडोळकर सह प्रशासन शेतकऱ्याच्या बांधावर..**

यावेळी उंबडगा बु येथील चेअरमन सुनील दादा बेंबडे, छावा संघटनेचे तालुका अध्यक्ष नितीन दादा साळुंके,तानाजी साळुंके ,भागवत साळुंके,सुधाकर पाटील, ज्ञानेश्वर हुरदूळे,अजित उपासे,सह उंबडगा गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते.